संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
12 OCT 2026
प्राप्त झाले सही.........................

एकतर्फी कार्यमुक्त करणेबाबत.
श्री. गोविंद निवृत्ती शिंदे, सहायक संचालक

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग,
शासन आदेश, क्रमांक:- ई-१८८२४८१/कोषा.प्रशा- २
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक:-१२ ऑक्टोबर, २०२६.

**संदर्भ** :- वित्त विभाग, शासन आदेश क्र. ई-१७१६३५३/कोषा.प्रशा-२, दि. २२.०७.२०२६.

**शासन आदेश**

संदर्भाधिन शासन आदेशान्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक संचालक संवर्गातील श्री.गोविंद निवृत्ती शिंदे, सहायक संचालक (लेखा), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर यांची लेखा अधिकारी वर्ग-१, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या पदावर महसूल संवर्ग बदलीने पदस्थापना करण्यात आली आहे. तथापि, सदर पदावर हजर होण्याकरीता श्री. शिंदे यांना त्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी अद्याप कार्यमुक्त केलेले नाही. यास्तव, संदर्भाधिन शासन आदेशाचे अनुपालन होण्याकरीता श्री. गोविंद निवृत्ती शिंदे, सहायक संचालक (लेखा), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर यांना सध्याच्या पदावरुन दिनांक १२.१०.२०२६ (म.नं.) पासून शासन स्तरावरून एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. तसेच, श्री. शिंदे यांचेकडील सध्याचा पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. शंकर रामजी बळी, लेखा अधिकारी वर्ग-१, रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

२. श्री. शंकर बळी यांनी त्यांच्या सध्याच्या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सांभाळून सहायक संचालक (लेखा), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार तात्काळ धारण करावा.

३. सहायक संचालक (लेखा), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर या पदावर नियमित अधिकाऱ्याची नियुक्ती झाल्यानंतर श्री. बळी यांच्याकडे सोपविण्यात आलेला सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार आपोआप संपुष्टात येईल.

४. संदर्भाधिन बदली आदेशानुसार श्री. शिंदे यांनी बदलीच्या पदावर तात्काळ हजर व्हावे. त्यांसंबंधीचा रूजू अहवाल शासनास सादर करावा. हे आदेश तात्काळ प्रभावाने अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AVINASH ARUN BHASARKAR

(अ. अ. भसारकर)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

रसुंग
१२/१०/२६

प्रति -

१. संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई,*
३. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*
४. संबंधित अधिकाऱ्यांच्या सध्याच्या कार्यालयाचे प्रमुख*,
५. संबंधित अधिकाऱ्यांची बदली झालेल्या कार्यालयाचे प्रमुख*,
६. श्री. गोविंद निवृत्ती शिंदे, सहायक संचालक*,
७. श्री. शंकरी रामजी बळी, लेखा अधिकारी वर्ग-१, रेशीम संचालनालय, नागपूर,*
८. निवडनस्ती/कोषा.प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(*संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)